महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in

**परीक्षा महत्वाचे**

क्रमांक पुविमं/ओ.2/खाजगी/ 6858
दिनांक 19 /08/2025.

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा/क.महाविद्यालय,
पुणे/अहिल्यानगर/सोलापूर.

**विषय : सन फेब्रु–मार्च 2026 करिता माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र ( इ.10वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) करिता ऑनलाईन खाजगी नावनोंदणी अर्जाद्वारे प्रविष्ठ विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज विभागीय मंडळास ऑनलाईन पध्दतीने पाठविणेबाबत.**

**संदर्भ :** 1.या कार्यालयाचे जा.क्र.पुविमं/ओ1/ओ 2/खाजगी/6681 दि.06/08/2026 चे पत्र
2. इ. 12 वी खाजगी विद्यार्थी माहिती व मार्गदर्शक सुचना
3. इ. 10 वी खाजगी विद्यार्थी माहिती व मार्गदर्शक सुचना

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) सन फेब्रु–मार्च 2025 पासून ऑनलाईन खाजगी नावनोंदणी अर्जाद्वारे प्रविष्ठ विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येत आहे. मागील वर्षी तसे काम ही आपल्यामार्फत पुर्ण करण्यात आले आहे.

सन फेब्रु–मार्च 2026 करिता ऑनलाईन खाजगी नावनोंदणी अर्जाद्वारे प्रविष्ठ विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज प्रस्ताव मुळ कागदपत्रांसह आपणास प्राप्त झाले असेल तर मंडळ कार्यालयास ऑनलाईनरित्या पाठविण्याची कार्यवाही करण्याबाबत संदर्भ क 1, 2 व 3 नुसार सुचना देण्यात आले आहे. *तसेच शाळेच्या/क. महाविद्यालयाच्या लॉगीन मध्ये ऑनलाईनरित्या प्राप्त विद्यार्थ्यांचे प्रस्ताव हे मुळ कागदपत्रांसह आपणास प्राप्त न झाल्यास विद्यार्थ्यांना लेखी, दुरध्वनीद्वारे किंवा एसएमएस/ई–मेल द्वारे कळवून त्यांची नोंद आपल्या कार्यालयीन अभिलेखात जतन करून ठेवण्यात यावी.*

*तसेच मंडळास असे निदर्शनास आले आहे की, काही शाळा/क. महाविद्यालयाने आपले माजी विद्यार्थी/गावातील विद्यार्थी किंवा सध्याच्या पत्त्यातील नजीकच्या परिसरातील विद्यार्थ्यांचे खाजगी नावनोंदणी अर्ज स्विकारत नाहीत. सदर बाब गंभीर स्वरूपाची आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस संबंधितांची जबाबदारी निश्चित करून खाजगी नावनोंदणी अर्ज न स्विकारणाऱ्या व मंडळाने निश्चित केलेल्या शुल्काव्यतिरिक्त अतिरिक्त शुल्क आकारणाऱ्या शाळा/क. महाविद्यालयाची खाजगी विद्यार्थी माहिती व मार्गदर्शक सुचना पुस्तिकेतील पान क्र. 10 वरील अ.क्र. 11 नुसार शाळा/क. महाविद्यालयाची मान्यता काढून घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.*

(कैलास दातखीळ)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे